# प्रेसनोट दि.०६/०५/२०१७

राजु मेहबुब शेख यांनी दि.०१/०४/२०१३ रोजी सकाळी ६.३० वा चे सुमारास पोर्णिमा टॉवर, शंकरशेठ रोड, पुणे येथे त्यांचा आलेला फुलांचा माल स्वतः उतरवुन घेतला. त्यावेळेस आरोपी याने टेम्पो चालकास नवीन हमाल ठेवला आहे का? असे म्हणाला. त्यावर तक्रारदार राजु मेहबुब शेख यांनी आरोपीस कोणाला हमाल म्हणाला असे विचारले असता, आरोपी याने त्याचे हातातील फायटर सारख्या वस्तुने तोंडावर मारल्याने त्यांचे चार दात पडले, डोळयाजवळ व नाकाजवळ गंभीर दुखापत झाली. तसेच त्यांना लाथा बुक्यांनी मारहाण केली, शिवीगाळ केली. तक्रारदार यांनी स्वारगेट पोलीस स्टेशन येथे तक्रार दिल्याने स्वारगेट पोलीस स्टेशन गु.रजि.नं.७०/२०१३, भा.दं.वि. कलम ३२६,३२४,३२३,५०४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास तत्कालीन पोलीस उप निरीक्षक वाय. ऐ. शेख यांनी करुन आरोपी विरुद्ध मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते. दाखल गुन्ह्याची सुनावणी मा.एम.पी. सराफ सो, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, मोटार व्हेईकल कोर्ट, पुणे यांचे न्यायालयात होऊन मा.न्यायालयाने सदर आरोपीस ६ महीने सक्तमजुरीचे कारावासाची आणि २०,०००/- रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. सदर सुनावणी वेळी पोलीस नाईक ५७३७ सकट यांनी गुन्ह्याचे साक्षीदार यांना सुनावणीच्या वेळी न्यायालयात वेळेत हजर ठेवले. तसेच सहा. सरकारी वकिल श्रीमती बाबर यांनी सरकारी पक्षा तर्फे योग्य बाजु मांडल्याने आरोपीस ६ महीने सक्तमजुरीचे कारावासाची आणि २०,०००/- रुपये दंडाची शिक्षा होणेस मोठे योगदान आहे.